मगांराग्रारोहयोजने अंतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजनेतील लाभार्थ्याला कुशल प्रदाने करण्याबाबतची सुधारीत कार्यपध्दती.

जा.क्र.आमगांराग्रारोहयो/परिपत्रक/तां.शा./ 839 /२०१७
आयुक्त महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण
रोजगार हमी योजना महाराष्ट्र, नागपूर
दिनांक २५.०७.२०१७

# परिपत्रक

प्रस्तावना :

म.गां.रा.ग्रा.रो.ह. योजनेमध्ये कुशल देयकाची प्रदाने ही ग्रामपंचायत मार्फत साहित्य पुरवठादारास (**Vendor**) करण्यात येते. तत्पूर्वी कुशल साहित्यासाठी लागणारा निधी कार्यक्रम अधिकारी (तहसिलदार/गटविकास अधिकारी) हे **FTO** मंजुर करुन ग्रामपंचायतीला प्रदान करतात. या कामासाठी सर्व ग्रामपंचायतींना महाराष्ट्र शासनाने **MIS** वर **Vendor** म्हणून नियुक्त केलेले असून कुशल साहित्य हे **TIN** क्रमांक असलेल्या पुरवठादाराकडून ग्रामपंचायतीने स्वतःची पत (**Credit**) वापरुन खरेदी करण्याची पध्दती सद्यस्थितीमध्ये अस्तित्वात आहे. प्रत्यक्षात लाभार्थी त्यांना आवश्यक असलेले साहित्य पुरवठादाराकडून स्वखर्चाने खरेदी करतात व त्याची देयके ग्रामपंचायतीला प्रदानांसाठी सादर करतात. ग्रामपंचायत त्यांना प्राप्त झालेल्या निधीमधून पुरवठदाराला प्राप्त देयकानुसार प्रदाने करते. काही लाभार्थ्यांकडून पुरवठादाराला अगोदरच साहित्य खरेदीचा मोबदला म्हणून रोखीने रक्कम अदा केली जाते. त्यामुळे पुरवठादाराकडून ही रक्कम प्राप्त करुन घेतांना लाभार्थ्यांची अडचण होत असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

यासाठी शासन स्तरावरुन कुशल साहित्याची प्रदाने करण्याच्या प्रचलित पध्दतीमध्ये अंशतः बदल करुन नविन पध्दत खालीलप्रमाणे अंमलात आणण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

सुधारित कार्यपध्दती :-

लाभार्थ्याने ग्रामपंचायत अथवा तांत्रिक अधिका-याकडून त्याच्या या योजने अंतर्गतच्या वैयक्तिक लाभाच्या कामासाठी आवश्यक असणा-या साहित्याचे परिमाण (Required Material Quantity) प्राप्त करुन घ्यावी. यानुसार जिल्हा/तालुका स्तरावर उपलब्ध असलेल्या TIN क्रमांक प्राप्त कोणत्याही पुरवठादाराकडून लाभार्थ्याने स्वखर्चाने साहित्य प्राप्त करुन घ्यावे. पुरवठादाराकडून प्राप्त देयक "मी स्वत: अदा केले" अशी नोंद घेऊन व स्वाक्षरी करुन ग्रामरोजगार सेवकामार्फत तांत्रिक अधिका-याकडे हस्तांतरीत करावे. तांत्रिक अधिका-याने त्याला प्रमाणित करुन व मोजमाप पुस्तिकेमध्ये नियमानुसार नोंदी घेऊन प्रदानासाठी कार्यक्रम अधिकारी (तहसिलदार / गट विकास अधिकारी) यांचेकडे सादर करावे. कार्यक्रम अधिका-यांनी देयकाची रक्कम FTO द्वारे ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करावी. ग्रामपंचायतीने अंतिमत: सदर रक्कम संबंधित लाभार्थ्यास RTGS/NEFT द्वारे प्रदान करावी.

ज्या लाभार्थ्यांनी पुरवठादाराला स्वत: रक्कम अदा न करता ग्रामपंचायतीची पत (Credit) वापरुन साहित्य प्राप्त करुन घेतले असेल अशा स्थितीमध्ये ग्रामपंचायतीला प्राप्त झालेली रक्कम पुरवठादाराला RTGS/NEFT द्वारे प्रदान करण्याची मुभा ग्रामपंचायतीला देण्यात येत आहे.

वैयक्तिक लाभांच्या कामासाठी लागणा-या साहित्याचे दर शासनपत्र क्र. मग्रारो-२०१७/प्र.क्र.७५/मग्रारो-१ दिनांक २४ जुलै, २०१७ अन्वये खालील कोष्टकामध्ये नमूद केल्यानुसार मान्य करण्यात आलेले आहे. वैयक्तिक लाभार्थ्याला साहित्यासाठीचे देयके प्रदान करतात या दराचा उपयोग करण्यात यावा.

वैयक्तिक लाभाच्या योजनेकरीता मंजुर दर :-

| अ.क्र | साहित्याचे नाव | लाभार्थ्याला परतफेड करावयाचे दर |
|---|---|---|
| 1 | सिमेंट | 290 रु. प्रति बॅग (50 Kg) |
| 2 | स्टील (Steel) | 38200 रु. प्रति Metric Ton |
| 3 | वाळु (Sand) | 750 रुपये प्रति घन मिटर (Cum) |
| 4 | वीट (Brick) | 6 रु. प्रति नग |
| 5 | दगड (Stone / Rubble) | 480 रु. प्रति (Cubic Meter) घन मिटर |

| | | |
|---|---|---|
| 6 | धातु (Metal)<br>अ) धातुचा आकार 40 mm पेक्षा जास्त आणि गिट्टीचा आकार 40 mm व 40 mm पेक्षा जास्त (रॉयल्टीसह)<br>आ) धातुचा आकार 40 mm पेक्षा कमी (रॉयल्टीसह) | 680 रु. प्रति घन मीटर<br><br>780 रु. प्रति घन मीटर |

सुधारित कार्यपध्दतीचा अवलंब करतांना खालील सुचनांचे पालन ग्रामपंचायतीने करावे.

1. सदर नविन कार्यपध्दती ही दि.31 जुलै 2017 नंतर प्राप्त देयकांना लागू करण्यात येत आहे.
2. लाभार्थ्याने कुशल साहित्याची खरेदी निश्चित केलेल्या किंवा त्यापेक्षा कमी दरात व **TIN** प्राप्त असलेल्या पुरवठादाराकडून करणे आवश्यक राहील, याबाबत लाभार्थ्याला ग्रामपंचायती कडुन माहिती देण्यात यावी.
3. निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त दराने लाभार्थ्याने साहित्य खरेदी केल्यास निश्चित करण्यात आलेल्या दरानेच देयक लाभार्थ्याला प्रदान करण्यात येईल मात्र निश्चित केलेल्या दरापेक्षा कमी दराने साहीत्याची खरेदी झाल्यास प्रत्येक्ष खरेदीच्या दराने लाभार्थ्याला रक्कम प्रदान करण्यात येईल.
4. लाभार्थ्याने स्वखर्चाने कुशल साहित्य पुरवठादाराकडून खरेदी केल्याची खात्री पटविल्यानंतरच ग्रामपंचायत ने लाभार्थ्याला **RTGS/NEFT** द्वारे रक्कम प्रदान करावी. ही खात्री पटविण्याची पूर्णत: जबाबदारी ग्रामपंचायत ची राहील.
5. ग्रामपंचायतीने कुशल देयकाचा निधी प्राप्तीनंतर सात दिवसात लाभार्थ्यांच्या खात्यात आवश्यक रक्कम जमा करणे बंधनकारक राहील. ही जबाबदारी ग्रा.पं. चे सरपंच व सचिव यांची संयुक्तपणे राहील.

(स्वाक्षरी) 25/07/2017

आयुक्त
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण
रोजगार हमी योजना- महाराष्ट्र, नागपुर

प्रतिलिपी :- १) मा.सचिव (रोहयो) नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई
२) विभागीय, आयुक्त सर्व
३) जिल्हाधिकारी सर्व
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व

Desktop/तांत्रिकशाखा -letter